FORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे लाप्रवि-मुंबई पहिली खबर क्र. ०७, वर्ष २०२३ दिनांक २३/०२/२०२३
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act प्र.प्र. अधिनियम-१९८८, कलमे Sections कलम-७
(ii) अधिनियम Act ..........., कलमे Sections ...........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...........

3. (a) अपराधाची घटना : वार २२/०२/२३, तारीख पासून २३/०२/२०२३, वेळ ..........., तारीख पर्यंत ..........., वेळ ...........
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख ..........., वेळ ...........
Information received at P.S. Date Time

(c) गुन्हा दाखल झालेच्या सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ५२/२०२३, तारीख २३/०२/२०२३, वेळ २३:०५ वा
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी तक्रार अर्ज, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..........., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव चुनाभट्टी वाहतूक विभाग, मुंबई, गल्ली ..........., रस्त्याचे नाव ...........
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळखीचे चिन्ह / ठिकाण सुमन नगर जंक्शन, चेंबूर, मुंबई तालुका ..........., जिल्हा ..........., राज्य ...........
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ..........., तालुका ..........., जिल्हा ..........., राज्य ...........
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address
(a) नाव Name मो. अजाज खान वजीर खान (b) वडीलांचे / पतीचे नाव वजीर खान
Father's /Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ०७/०७/१९८१, ४१ वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 9322134312
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ..........., दिल्याचा दिनांक ..........., दिल्याचे ठिकाण ..........., (f) व्यवसाय ...........
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste ..........., जनजात Sub-Caste ...........
(h) पत्ता प्लॉट नं. ३, न्यू गौतम नगर, गोवंडी, मुंबई पॅन नं. ..........., वोटर्स नं. ...........
Address Ward House Name No. Phone/M. No. Pan No. Card No.
रस्त्याचे नाव ..........., जवळचे प्रसिद्ध ठिकाण ..........., गाव ..........., पोस्ट ..........., पो. स्टे. ...........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ..........., जिल्हा ..........., राज्य ..........., सध्याचा पत्ता ...........
Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन त्यासोबत असलेल्या प्रथम खबरीला व अ. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

१) सुरेश नवल पवार, वि. ५४ वर्षे, धंदा- नोकरी पद- पो.ह.नं. ०८-१३२५/ चुनाभट्टी वाहतूक विभाग, चेंबूर, मुंबई-७१, रा. डी. एल. आर.जी. २, सेक्टर २ ई, स्मृती गार्डन जवळ, ता० पनवेल, जि० रायगड

Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी नामे मो अजाजखान वजीर खान. मु. ४७ वर्षे यांनी आज दि. २३/०२/२०२३ रोजी स्वतंत्र पानावर मराठीतून संगणकात टंकलिखीत केलेला जबाब हाच नमुद गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(मनोज शिरगे)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई

Scanned with OKEN Scanner

फिर्याद        दि. २३/०२/२०२३

श्री. महंमद अजाज खान वजीर खान, ४१ वर्षे, धंदा- रिक्षाचालक, रा.ठि. रूम नं २००६ विसावा मजला पंचशील एकता को ऑ हौ सो न्यु गौतम नगर जवळ प्लॉट नं ०३ गोवंडी पश्चिम मुंबई ४०००४३ मो. क्र. ९३२२१३४३१२ आधार कार्ड क्र. ६६९१ ०३३२ ४१४९

...ooo...

मी वर नमूदप्रमाणे असून वर नमूद पत्त्यावर माझे जन्मापासून रहावयास आहे. माझे सोबत माझी पत्नी व मुले रहावयास आहेत. माझे मुळ गांव मु.पो. असरपुर, जि. बाका, गांव- सुलतानपुर, भागलपुर, बिहार असून सदर ठिकाणी माझे कोणीही नातेवाईक रहावयास नाहीत. माझे स्वत:च्या मालकीची काळ्या-पिवळ्या रंगाची रिक्षा क्र. MH-03-CN-8358 असून मी मागील बावीस वर्षापासून रिक्षा चालवतो व त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह होतो.

दि. ०६/०२/२०२३ रोजी मी नेहमीप्रमाणे रिक्षा घेवून निघालो असता चेंबूर घाटला खारदेवनगर ते बांद्रा असे एका महिला पॅसेंजरचे भाडे घेवून सुमननगर हायवेवरून जात असताना सुमन नगर ट्रफिक चौकीजवळ सिग्नल लागल्यामुळे मी रिक्षा थांबविली होती. त्यावेळी सदर ठिकाणी ड्युटीवर असलेल्या पोलीसाने मला रिक्षा बाजूला घेण्यास सांगितले व माझेकडे रिक्षाच्या कागदपत्रांची मागणी केली. त्यानुसार नमूद ड्युटीवरील पोलीस पवार यांचेकडे मी माझे रिक्षाची सर्व कागदपत्रे दिली. त्यावेळी त्यांनी कागदपत्रे तपासून माझे रिक्षाचे परमिट संपले असल्याचे मला सांगितले. यावर मी त्यांना सदर परमिट नुतनीकरणाकरीता आर.टि.ओ. येथे दिले असल्याचे सांगून त्याबाबतची पावती दाखविली. तेव्हा त्यांनी मला सदर पावती चालत नसल्याचे सांगितले व रू. २२,०००/- (बावीस हजार रू.) दंड भरावा लागेल, असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना माझेकडे एवढे पैसे नसल्याचे सांगून मी माझे परमिट नुतनीकरणाकरीता आर.टि.ओ. येथे जमा केले असून रिक्षा सोडण्याची विनंती केली. त्यावेळी त्यांनी माझेकडे रू.२,०००/- (रू.दोन हजार फक्त) रकमेची मागणी करून मला रू. २०००/- दे मी तुला सोडतो असे सांगितले. परंतू रिक्षात असलेल्या महिला भाडेकरूला उशिर होत असल्याने पोलीस पवार यांनी माझे रिक्षाचे लायसन्स माझेकडून काढून घेतले व मला रू. २,०००/- घेवून ये व लायसन्स घेवून जा असे सांगितले.

दि. ०६/०२/२०२३ रोजी पोलीस पवार यांनी माझे रिक्षाचे लायसन्स घेतल्यानंतर मी दि. ०७/०२/२०२३ व त्यानतर दि. २२/०२/२०२३ रोजी सकाळी जावून त्यांचेकडे माझे लायसन्स देण्याची विनंती केली परंतू पोलीस पवार यांनी मला रू. २,०००/- (रू.दोन हजार फक्त) रकमेच्या लाचेची मागणी करून पैसे दे व लायसन्स घेवून जा असे दोन्ही वेळेस सांगितले.

मला पोलीस पवार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी सदरबाबत तक्रार करण्याचे ठरविले. मला कानाने कमी ऐकू येत असल्याने मी माझा भाऊ नामे श्री. जमाल खान यांचेसह तक्रार देण्याकरीता दि. २२/०२/२०२३ रोजी सांयकाळी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे येवून तक्रार केली. त्यावेळी पोनि जिरगे यांनी माझेकडे तक्रारीबाबत विचारणा करून माझी तक्रार मराठित लिहून घेतली व हिंदीतून वाचून दाखविली. ती माझे म्हणण्याप्रमाणे बरोबर होती. पोनि जिरगे यांनी सदर तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला व

समक्ष

( मनोज जिरगे )
पोलीस निरीक्षक
लाप्रवि, मुंबई.

२२/२/२३

Scanned with OKEN Scanner

लागलीच कारवाई करण्याचे मला सांगितले परंतू मी पोनि जिरगे यांना पोलीस पवार यांची ड्युटी दुपारी ०३.०० वा. पर्यंत असल्याचे सांगितले असता पोनि जिरगे यांनी मला तक्रारीची पडताळणी करण्याकरीता दि. २३/०२/२०२३ रोजी सकाळी लाप्रवि, वरळी कार्यालयास बोलाविले.

त्यानुसार मी दि. २३/०२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा. माझा भाऊ श्री. जमाल खान याचेसह लाप्रवि, वरळी कार्यालयास हजर झालो. पोनि जिरगे यांनी मी केलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यात येणार असून पडताळणी झाल्यास लागलीच सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येईल असे मला सांगितले. त्यांनतर पोनि जिरगे यांनी दोन शासकीय पंचांना बोलाविले व त्यांना मी केलेला तक्रार अर्ज दाखविला. त्यांनतर पंचांनी तक्रार अर्ज वाचून माझेकडे मी केलेल्या तक्रारीची शहानिशा केली व मी सदर तक्रार बरोबर असल्याचे सांगितल्यावर पंचांनी सदर तक्रार अर्जावर स्वाक्षऱ्या केल्या.

त्यांनतर पोनि जिरगे यांनी माझी ओळख सापळा पथकातील पोनि लांधी व अंमलदार यांचेशी करून दिली. त्यांनतर पोनि जिरगे यांनी लोकसेवक लाचेची मागणी करणार आहेत किंवा कसे? याबाबत पडताळणी करण्यात येणार असून सदर संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात येईल. असे सांगून पडताळणी निष्पन्न झाल्यास सापळा कारवाई करण्यात येईल असे सांगितले. त्याप्रमाणे पोनि जिरगे यांनी मला व पथकास सुचना दिल्या. त्यांनतर मी, माझा भाऊ, पथक व पंच असे कारवाईकरीता रवाना होणेकरीता लाप्रवि वरळी विभागाच्या आवारात आलो. मी, माझा भाऊ, पोनि जिरगे, पोनि लांधी, पंच असे आम्ही एका शासकीय वाहनात बसलो व इतर पथक साधनसामुग्रीसह दुसऱ्या शासकीय वाहनात बसले. दुसऱ्या वाहनास पोनि जिरगे यांनी चुनाभट्टी परिसरात थांबण्यास सांगितले व आम्ही रवाना झालो. त्यावेळी ११.५० वाजले होते.

मी बसलेल्या वाहनातील चालकास वाहन चुनाभट्टीच्या दिशेने घेण्यास सांगितले व वाहन नव सहजीवन सोसायटी, चुनाभट्टीच्या बाजूला आल्यांनतर मी पोनि जिरगे यांना येथून नजीकच चेंबूर वाहतूक चौकी असल्याचे सांगितल्याने पोनि जिरगे यांनी चालकास वाहन थांबविण्यास सांगितले. त्यानुसार चालकाने वाहन रस्त्याच्या कडेला कोणासही संशय येणार नाही अशा रितीने थांबविले.

पोनि जिरगे यांनी माझे खाकी शर्टाच्या आतील बाजूस बनियनला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावला व मला लोकसेवक यांची भेट घेवून त्यांचेकडे तक्रारीबाबत बोलणे करण्यास सांगितले. पडताळणीकरीता माझेसोबत पंच क्र. ०१ श्री. नरवाडे व माझा भाऊ जमाल खान हे येणार असल्याचे सांगितले. पोनि जिरगे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू केला व आम्ही चेंबूर वाहतूक चौकीच्या दिशेने रवाना झालो. ती वेळ १२.४० वा. ची होती. आम्ही चेंबूर वाहतूक पोलीस चौकीजवळ आलो असता लोकसेवक हे सुमननगर सिग्नलजवळ उभे होते. त्यावेळी मी त्यांची भेट घेतली व ते आम्हाला घेवून चुनाभट्टी वाहतूक चौकीत गेले. त्यावेळी लोकसेवक यांनी पंचांना हाताने इशारा करून चौकीच्या बाहेर थांबण्यास सांगितल्याने पंच हे चौकीच्या बाहेर थांबले व मी तसेच माझा भाऊ जमाल खान असे पोलीस पवार यांचेसह चौकीत गेलो. त्यांनतर मी पोलीस पवार यांचेकडे माझे रिक्षाचे लायसन्स देणेबाबत विचारणा केली असता त्यांनी माझेकडे **दो हजार रूपये भर रहा है** .. यावर मी **कुछ कम करलो ना साहब** असे बोललो असता पोलीस पवार यांनी मला **पंधरासो लगें गे** ...त्यांनतर मी **हां ....कितना दु....** अशी पुन्हा विचारणा केली असता पोलीस पवार यांनी मला **पंधरा सो**.. असे बोलून तडजोडीअंती रू. १५००/-

समक्ष

( मनोज जिरगे )
पोलीस निरीक्षक
लाप्रवि, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

(एक हजार पाचशे रू. फक्त) लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना पैसे घेवून येतो असे सांगून त्या ठिकाणाहून पंचासह शासकीय वाहनाच्या दिशेने रवाना झालो.

शासकीय वाहनाजवळ आल्यानंतर पोनि जिरगे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केला. ती वेळ १३.२९ वा. ची होती. पोनि जिरगे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून ऐकला असता त्यामध्ये लोकसेवक यांनी माझेकडे रू. १५००/- लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोनि जिरगे यांनी दुसऱ्या शासकीय वाहनातील अंमलदारांना संपर्क साधून बोलावून घेतले व पथक आल्यानंतर पोनि जिरगे यांनी पथकास पडताळणी झाली असल्याचे सांगून सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे मला, पंच व पथकास सांगितले. त्यानुसार पोनि जिरगे यांनी माझेकडील रू. १५००/- (एक हजार पाचशे रू. फक्त) स्वतःकडे घेतले व पोह ९८०८१५/चिंचोलकर यांना देवून त्यांना सदर नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यास सांगितले. त्यानुसार पोनि चिंचोलकर यांनी आम्हास अँन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म सांगून सदर नोटांना पावडर लावली. सदर पावडर लावलेली रक्कम मी माझे शर्टाच्या डाव्या बाजूच्या खिशात ठेवली. त्यानंतर पोह चिंचोलकर हे सापळा कारवाईमध्ये भाग घेण्यास नसल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि जिरगे यांनी सापळा कारवाईकरीता माझेसोबत पंच क्र. ०१ श्री. नरवाडे व जमाल खान हे येणार असल्याचे सांगून आम्हास सुचना दिल्या. तसेच सापळा पथकास चेंबूर वाहतूक चौकीच्या बाहेर कोणासही संशय येणार नाही अशा रितीने थांबण्यास सांगितले व लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझेजवळील हातरूमाल तोंडावरून व डोक्यावरून फिरवून पथकास ईशारा करण्यास सांगितले. त्यानंतर पोनि जिरगे यांनी माझे खाकी शर्टाच्या आतील बाजूस डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावला व चालू केला. ती वेळ १३.१६ वा. ची होती. त्यानंतर मी व पंच चेंबूर वाहतूक चौकीच्या दिशेने रवाना झालो.

आम्ही चेंबूर वाहतूक पोलीस चौकीजवळ आलो असता लोकसेवक हे सुमन नगर सिग्नलजवळ उभे होते. त्यांनी आम्हास पाहिल्यानंतर फक्त मला आणि माझ्या भावाला चौकीत येण्याचा ईशारा केला. त्यानुसार मी व माझा भाऊ जमाल खान असे चेंबूर वाहतूक पोलीस चौकीत गेलो व लोकसेवक यास संशय येवू नये याकरीता पंच हे चौकीच्या बाहेर थांबले. चौकीत गेल्यानंतर लोकसेवक यांनी माझेकडे लाचेच्या रकमेची मागणी केली असता मी त्यांना लाचेची रक्कम रू. १५००/- (एक हजार पाचशे रू. फक्त) दिली. पोलीस पवार यांनी सदर लाचेची रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्विकारून दोन्ही हातांनी मोजले व त्यानंतर डाव्या हाताने गणवेषाच्या पँटच्या डाव्या खिशात ठेवले व त्यानंतर लोकसेवक यांनी मला माझे रिक्षाचे लायसन्स परत केले. रिक्षाचे लायसन्स घेवून मी चौकीबाहेर येवून माझेकडील हातरूमाल माझे तोंडावरून व डोक्यावरून फिरवला व पथकास ईशारा केला असता पथकाने लागलीच येवून लोकसेवक यांनी ताब्यात घेतले.

तरी चुनाभट्टी पोलीस चौकीचे पोह पवार यांनी माझे रिक्षाचे लायसन्स स्वतःचे ताब्यात ठेवून ते परत करण्याकरीता माझेकडे रू. २०००/- (दोन हजार रू. फक्त) रकमेच्या लाचेची मागणी केली व तडजोडीअंती रू. १५००/- (एक हजार पाचशे रू. फक्त) लाच स्विकारली म्हणून माझी पोह पवार यांचेविरोधात कायदेशीर तक्रार आहे.

माझी फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखित करण्यात आली असून, ती मला वाचून हिंदीतुन समजावुन सांगितली, ती माझे सांगणेप्रमाणे व घडलेल्या घटनांप्रमाणे खरी व बरोबर आहे.

समक्ष

( मनोज जिरगे )
पोलीस निरीक्षक
लाप्रवि, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे त्वरीत

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकुण मुल्य

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) लाचेची रक्कम रु.१५००/-

11. अकस्मात मृत्यु / अपघाती मृत्यु असल्यास त्याचा क्रमांक :

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद लो.से. व ठि. आलोसे यांनी यातील फिर्यादी यांचे लाचुसलत स्वतःच्या ताब्यात ठेवून ते परत देण्याकरीता रु.२०००/- लाचेच्या रकमेची मागणी केली. 'फि' यांनी आलोसे यांच्याशी केलेल्या तडजोडीअंती रु.१५००/- स्विकारण्याचे मान्य केले. व रु.१५००/- स्विकारताना रंगेहात पकडले म्हणून 'फि' यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आलोसे यांच्याविरुद्ध ला.प्र.वि. गु.र.क्र. ००/2023 कलम ०७ भ्र.प्र. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरुन कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : श्री. मनोज शिरगे, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ , जिल्हा ........ , राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ........ Rank ........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P.S ........ District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही

Signature of Officer In-charge, Police Station

संपूर्ण नाव Name मनोज शिरगे

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड. क्र. ला.प्र.वि. मुंबई

Posting

Code No. of I.O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 24/02/2023

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner